**मा.बाळासाहेब ठाकरे व्यवसाय आणि ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प**

**(जागतिक बँक अर्थसहाय्यीत)**

**गोदाम पावती योजना व्यवस्थेचे बळकटीकरण**

**प्रकल्पाचा उद्देश:**

- कृषि परीवर्तनाच्या अनुषंगाने कृषि क्षेत्राशी निगडीत संस्थात्मक व्यवस्थेचे बळकटीकरण करणे.
- बाजार संपर्क वाढवून कृषि व्यवसाय वृद्धी करणे.
- शेतमाल बाजार जोखीम निवारणासाठी व्यवस्था निर्माण करणे.

❖ स्मार्ट प्रकल्पाच्या ७ विभागामार्फत ११ प्रकल्प अंमलबजावणी कक्षांची स्थापना. त्यापैकी महाराष्ट्र सहकार विकास महामंडळामार्फत स्मार्ट प्रकल्पाकरीता सहकार विभागाचे प्रतिनिधित्व.

❖ महाराष्ट्र सहकार विकास महामंडळात स्मार्ट प्रकल्पाच्या अंमलबजावणीकरीता **" प्रकल्प अंमलबजावणी कक्ष- (PIU-MCDC SMART)**ची राज्यस्तरावर स्थापना (प्रकल्प कालावधी २०२० ते २०२७)

❖ स्मार्ट प्रकल्पामार्फत गोदाम पावती व्यवस्थेचे बळकटीकरण या घटकांतर्गत प्राथमिक कृषि सहकारी संस्थाच्या

(PACs)- सभासदांकरीता पर्यायी बाजारपेठेची निर्मिती.

❖ प्रकल्पामार्फत प्राथमिक कृषि सहकारी संस्थांच्या आर्थिक विकासासाठी ३५.५१ कोटी अनुदानाची तरतूद उपलब्ध.

❖ गोदामाचीं दुरुस्ती व नविन गोदाम उभारणी तसेच स्वच्छता व प्रतवारी सुविधा, कोलॅटरल मॅनेजमेंट संस्थेचे शुल्क प्रकल्पाच्या अनुदानातून देण्याचे नियोजन .

❖ प्रकल्पातून ६०% अनुदान तर संस्थेचा ४० % स्वहिस्सा, प्रत्येक सहकारी संस्थेस सुमारे १ कोटी रुपयांपर्यंत अनुदान

❖ प्राथमिक कृषि सहकारी संस्थांमार्फत गोदाम पावती व्यवसाय सुरू करण्यासाठी कोलॅटरल मॅनेजमेंट कंपनीमार्फत एक वर्ष कालावधीपर्यंत प्रत्यक्ष संस्थेच्या कार्यक्षेत्रातच प्रशिक्षण

❖ प्राथमिक कृषि सहकारी संस्थेच्या सभासदाना गोदाम पावती कर्ज, शेतमालाची सुरक्षा, शेतमालाचे विक्री व्यवस्थापन या सुविधा गावपातळीवर उपलब्ध होणार.

❖ राज्यात ८० प्राथमिक कृषि सहकारी संस्थांना गोदामाचीं दुरुस्ती व १९ प्राथमिक कृषि सहकारी संस्थांना नवीन गोदामे उभारण्या करीता प्रकल्पांतर्गत सहकार्य करण्यात येणार.

## प्रकल्प अंमलबजावणी कक्ष , एमसीडीसी मार्फत राबविण्यात येणारा घटक

- स्मार्ट प्रकल्पांतर्गत **जोखीम निवारणेची व्यवस्था उभी करणे** हा महत्वाचा घटक आहे. सद्यस्थितीत उत्पादित कृषी माल साठवणूक करणेसाठी सुलभ, वाजवी दरात व नजीकच्या क्षेत्रात गोदाम व्यवस्था उपलब्ध नाही. त्यामुळे स्मार्ट प्रकल्पांतर्गत अशी व्यवस्था प्राथमिक कृषि सहकारी संस्थांच्या यांचे माध्यमातून उपलब्ध करणे असे उद्दिष्टे ठेवण्यात आले आहे. या सहकारी संस्थांकडे गोदाम उभारणी मधील तांत्रिक ज्ञान व गोदाम व्यवस्थापन याचे प्रशासकीय ज्ञान नसल्याने स्मार्ट प्रकल्पांतर्गत महाराष्ट्र सहकार विकास महामंडळाच्या माध्यमातून सहकारी संस्थांकरीता गोदाम पावती योजनेचे बळकटीकरण/ गोदाम व गोदाम पावती अर्थसहाय्य योजना हा उपघटक राबविण्यात येत आहे.

  गोदाम पावती योजना बळकटीकरण अंमलबजावणी/ वखार व वखार पावती अर्थसहाय्य योजना-

  1. सहकारी संस्थांच्या स्वत:च्या मालकीच्या गोदामांचे नूतनीकरण
  2. नवीन गोदामांची उभारणी
  3. इंटरनेट व इतर साधनांच्या माध्यमातून गोदामांचे व्यवस्थापन (IoT)

वरील उपघटकांची अंमलबजावणी राज्यातील **फक्त प्राथमिक कृषि सहकारी संस्थाकडून (PACs-पॅक्स)** पात्र निकषांच्या आधारे अर्ज स्विकारण्यात येत आहेत.

- स्मार्ट प्रकल्पांतील C-2 या उपघटकांतर्गत महाराष्ट्र सहकार विकास महामंडळाच्या वतीने प्राथमिक कृषि सहकारी संस्थाना आर्थिकदृष्टया सक्षम करण्यासाठी त्यांच्या स्वमालकीच्या जुन्या गोदामांचे कमी खर्चात आवश्यकतेनुसार नूतनीकरण करणे, नवीन गोदामे उभारणे अथवा गोदामे भाडेतत्वावर घेणे, या गोदामांमध्ये गोदाम पावती (Warehouse Receipt) योजना राबविणे अथवा शेतमाल साठवणुकीवर अर्थसहाय्य (गोदाम/वखार पावती योजना) उपलब्ध करणे, शेतमाल तारण व्यवस्थापन (CMA- Collateral Management Agency) संस्थेच्या सहाय्याने संस्थांना गोदाम व्यवसाय उभारणीस सहकार्य करणे व यामाध्यमातून सहकारी संस्थेचे उत्पन्न वाढविणे, साठविलेल्या शेतमालास बाजारपेठ उपलब्ध करून देणे , यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. गोदाम पावती बळकटीकरण या प्रकल्पातील घटकांतर्गत खालील प्रमाणे पाच प्रमुख भागामध्ये गोदाम विस्तारीकरण करून गोदामे अद्यावत करणे आवश्यक आहे.

  अ) जुनी गोदामे दुरूस्त करणे.
  ब) जुनी गोदामे दुरूस्त करणे व स्वच्छता व प्रतवारी यंत्र बसविणे.
  क) नवीन गोदाम बांधकाम करणे.
  ड) नवीन गोदाम बांधकाम करणे आणि स्वच्छता व प्रतवारी यंत्र बसविणे.
  इ) जुनी गोदामे दुरूस्त करणे, नवीन गोदाम बांधकाम करणे, स्वच्छता व प्रतवारी यंत्र बसविणे.

## प्राथमिक कृषि सहकारी संस्थाकरीता (PACs-पॅक्स) गोदाम पावती योजनेमध्ये खालील महत्वपूर्ण बाबींचा समावेश आहे

1) सहकारी संस्थांच्या स्वत:च्या मालकीच्या गोदामांचे नूतनीकरण :

- या घटकांतर्गत गोदामांचे क्लस्टर तयार केले जाणार असून त्याची क्षमता सुमारे 2000 मे. टन असेल. मुख्य गोदामापासून ४ ते ५ कि.मी. अंतराच्या कक्षेत असणाऱ्या प्राथमिक कृषि सहकारी संस्थांना (PACS) जुन्या गोदामांची डागडुजी करण्यासाठी प्रकल्पातून व्यवसाय आराखडयातील किंमतीच्या ६०% अनुदान (आर्किटेक्टच्या एस्टिमेटनुसार व प्रकल्पाच्या अटी व शर्ती नुसार) उपलब्ध करुन देण्यात येते.
- स्वच्छता व प्रतवारी केंद्रासाठी स्पायरल सेपरेटर , संगणक व वजनकाटा या मशीनरी व यंत्रसामुग्री (क्षमता आवश्यकतेनुसार) खरेदीकरीता आर्थिक सहाय्य स्मार्ट प्रकल्पातून देण्यात येते.
- प्राथमिक कृषि सहकारी संस्थेकडील (PACS) ४०० ते ५०० मे.टन. क्षमतेच्या गोदामांचा वापर शेतमाल साठवूण करणेसाठी कोलॅटरल मॅनेजमेंट संस्थेची (CMA) ३ ते ५ किमी परिसरात एकूण साठवणुकीची क्षमता २००० मे. टन पर्यन्त निर्धारित केली आहे. या कोलॅटरल मॅनेजमेंट सर्व्हिसेस या विषयात कामकाज करणाऱ्या संस्था प्राथमिक कृषि सहकारी संस्थासाठी गोदाम पावती योजना राबविण्याचे काम करतील. सदर संस्थांमार्फत गोदामांचे व्यवस्थापन करणे, गोदाम पावती उपलब्ध करुन देणे, बॅकांमार्फत कर्ज तारणाकरीता अर्थसहाय्य देणे, गोदामातील मालाचे संरक्षण करणे, मालाची विक्री व्यवस्था पाहणे, मनुष्यबळ उपलब्ध करणे, इत्यादी करण्यात येते. याकरीता कोलॅटरल मॅनेजमेंट सर्व्हिसेस (सी.एम.ए सेवापुरवठादार संस्था) यांचे वार्षिक शुल्कातील ६०% शुल्क अनुदान स्वरूपात एक वर्षासाठी प्रकल्पामार्फत देण्यात येते. एका वर्षानंतर कोलॅटरल मॅनेजमेंट सर्व्हिसेस यांच्या सेवा प्राथमिक कृषि सहकारी संस्थाना योग्य वाटल्या तर ते पुढे स्वतंत्र करार करून पुढे कामकाज करू शकतील. त्यानंतर त्यांना प्रकल्पाकडून कोणतेही अनुदान सेवा शुल्क देण्यासाठी उपलब्ध होणार नाही.

**२) नवीन गोदामांची उभारणी**

- सहकारी संस्थांकडील गोदामांचे नूतनीकरण केल्यामुळे गोदाम पावती योजनेची अंमलबजावणी करणे सोईस्कर होऊ शकेल. यामुळे संस्थेच्या आर्थिक उलाढालीमध्ये वाढ संभवते. या अनुभवाच्या व पात्रतेच्या अटी व शर्तीनुसार सदर संस्था नवीन गोदाम उभारुन व्यवसाय वृध्दीगंत करणेसाठी प्रयत्न करु शकते.
- त्याअनुषंगाने प्रकल्पाने नवीन गोदाम उभारणीसाठी सदर घटकाची निर्मिती केली असून, ज्या संस्थांनी स्वत:कडील अस्तित्वात असलेल्या गोदामांचे नूतनीकरण करुन वखार पावती योजनेची प्रभावी अंमलबजावणी करुन व्यवसाय वृध्दींगत केला आहे अशा संस्थांना नवीन गोदाम उभारणी करण्याकरीता प्रकल्पामार्फत अर्थसहाय्य देण्यात येते. त्यानुसार सुमारे १९ (क्षमता १००० मे. टन प्रति गोदाम) नवीन गोदामांची उभारणी करण्यात येणार असून त्या आधारे संबधीत संस्थाचे आर्थिक उत्पन्न वाढविण्याचे नियोजन करण्यात आले आहे. नवीन गोदाम उभारणी करण्यासाठी प्रकल्पातून व्यवसाय आराखडयातील किमतीच्या ६०% (आर्किटेक्टच्या एस्टिमेटनुसार व प्रकल्पाच्या अति व शर्तीनुसार) अनुदान उपलब्ध करुन दिले जाणार आहे. (याकरीता प्रकल्पामार्फत गोदाम उभारणी साठी प्रति मे. टन खर्चाची किंमत ठरवून दिलेली असून त्यानुसार अनुदान ग्राह्य धरले जाईल.

४) **इंटरनेट व इतर साधनांच्या माध्यमातुन गोदामांचे व्यवस्थापन (IoT- Internet of Things)**
सहकारी संस्था गोदाम पावती योजना राबविताना पारंपरिक पद्धतीने योजना राबवित असल्यास या योजनेचे digitization करण्याच्या अनुषंगाने या घटकाची निर्मिती करण्यात आली आहे.

- गोदामांचे व्यवस्थापन उत्कृष्ट पध्दतीने करण्यासाठी प्रायोगिक तत्वावर IoT तंत्रज्ञानाचा वापर करणे.
- यामध्ये प्रामुख्याने CCTV, Alarm, RFID Tags, Wireless Beacons, Door Safety Alarm, Temperature & Motion Sensor, Smoke-Detector , सॉफ्टवेअर इत्यादि . प्रकारचे अत्याधुनिक साधनांचा गोदामांच्या सुरक्षिततेसाठी वापर करणे.
- गोदाम व्यवस्थापनासाठी आधुनिक प्रकारचे सॉफ्टवेअरचा वापर करणे.
- गोदाम व्यवस्थापन प्रक्रियेमध्ये सदर तंत्रज्ञानामुळे संपूर्ण पूरवठा साखळीचे उत्कृष्ट व्यवस्थापन व ख-या माहीतीचे संकलन करणे.

- पहिल्या टप्प्यात काही गोदामांमध्ये प्रायोगिक तत्वावर IoT तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे नियोजन आहे.

## गोदाम पावती योजना बळकटीकरण उपप्रकल्पांसाठी प्राथमिक कृषि सहकारी संस्था निवडीचे निकष:-

### अनिवार्य निकष

a) संस्था कायदेशीररीत्या नोंदणीकृत असावी. लेखापरीक्षकाद्वारे लेखापरिक्षण केलेले असावे.

b) प्राथमिक कृषि सहकारी संस्थेचे **किमान २५० भागधारक** असणे आवश्यक आहे.

c) उपप्रकल्पासाठी संस्थेकडे स्वत:च्या मालकीची आवश्यक जागा/स्वत:च्या मालकीचे गोदाम अथवा २९ वर्षाचा दुय्यम निबंधकाकडील नोंदणीकृत भाडेकरार तत्वावर जागा अथवा भाड्याचे गोदाम असणे आवश्यक आहे. स्वत:च्या मालकीच्या जागे संबंधी व गोदामासंबंधी **संस्थेच्या नावाचा सातबारा** सादर करणे बंधनकारक असेल. अशा क्षेत्रावर इतर कोणाचाही हक्क / बोजा असू नये. अशा क्षेत्राचा स्वतंत्र हिस्सा / पोट हिस्सा नकाशा असल्यास प्राधान्य.

ज्या संस्थेकडे स्वत:ची जागा नसेल त्यांना प्रकल्पाच्या प्राथमिक मंजूरीनंतर कमाल 3 महिन्यात खरेदीपत्र अथवा **२९ वर्षाचा** दुय्यम निबंधकाकडील **नोंदणीकृत भाडे करारनामा सादर** करणे बंधनकारक राहील.

d) निवडलेली जागा शक्यतो मुख्य रस्त्यालगत वीज व पाणी पुरवठा या सोयीसह असावी.

e) संस्थेच्या **लेखापरीक्षण अहवालात** लक्षणीय लेखा आक्षेप नसावेत.

f) संस्था कोणत्याही कर्जाची **थकबाकीदार नसावी**.

g) संस्थेचा मागील **५वर्षातील एका वर्षात किमान रुपये १००.००** लाखापेक्षा जास्त वित्त कर्ज पुरवठा नोंद लेखापरीक्षण अहवालात असावी.

h) संस्थांनी मागील **५वर्षात किमान १०००** मे.टन धान्य/ कडधान्ये / शेतमालाचे एकत्रिकरण (Aggregation) करुन वार्षिक विक्री केलेली असल्यास प्राधान्य .

i) संस्थेच्या किमान **२ वार्षिक सर्वसाधारण सभांचे (AGM)** इतिवृत्त जोडावे.

j) गोदाम यशस्वीपणे चालविण्यासाठी संस्थेस त्या विभागातील पिकप्रणाली, मुख्य पिकाचे उत्पादन व उत्पादकता, अशा पिकाचा विक्री अधिशेष (Marketable Surplus) त्या विभागात उपलब्ध असणारी साठवणूक क्षमता व नवीन गोदाम बांधकामास मिळवू शकणारा संभाव्य व्यवसाय या संबंधित परिपूर्ण माहिती (अचूक आकडेवारी / Data) उपलब्ध करुन घेणे आवश्यक आहे.